# ऑनलाईन बुकगंगा विश्व साहित्य संमेलन आजपासून

पुणे, दि. ४ (प्रतिनिधी) - मराठी साहित्य संमेलन आणि वाद हे जणू समीकरणच. मात्र, याला फाटा देत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मराठी सारस्वतांचा मेळा भरणार आहे तो ऑनलाईन विश्व साहित्य संमेलनाच्या रूपाने. बुकगंगा डॉटकॉमतर्फे उद्या (दि. ५) ऑनलाईन बुकगंगा डॉटकॉम मराठी साहित्य संमेलन सुरू होणार आहे.

या ऑनलाईन साहित्य संमेलनाची माहिती मंदार जोगळेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. बुकगंगाचे धनंजय दातार, ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा, प्रसिद्ध निवेदक सुधीर गाडगीळ यावेळी उपस्थित होते. जोगळेकर म्हणाले, हिंदुस्थानी, मराठी साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी हे ऑनलाईन साहित्य संमेलन १५ सप्टेंबरपर्यंत असणार आहे. यात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी www.vishwasahityasammelan.org या संकेतस्थळाला भेट द्यावी. अधिक माहितीसाठी ९८८११२४३४१ या क्रमांकावर संपर्क साधावा.